VOL- XII | ISSUE- IV | APRIL | 2025 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.379 | ISSN 2349-638x

# पंचायत राज्याची पायाभूत संस्था – ग्रांमपंचायत व पंचायत राज्यपध्दतीच्या मुल्यमापण समित्या : एक आढावा

अर्पित मनोहर थुल

सारांश:

*या शोध लेखा मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था विशेषता ग्रामपंचायत ही ग्रामीण स्तरावर नागरीकांकरिता कार्य करणारी संस्था असून विविध अधिनियमा अंतर्गत लोकसंख्येच्या आधारावर ग्रामपंचायतची स्थापना करण्यात आली आहे. तसेच या मधिल उणीवा दुर करण्याकरिता राज्य सरकार व केंद्र सरकारणी विविध महत्वपूर्ण समित्यांची उभारणी करून, समित्यांनी उणिवा दुर करण्या करिता शिफारशी सुचवल्या आहेत.*

ग्रामपंचायत म्हणजे पंचायत राज्याच्या त्रिस्तरीय योजनेतील तिसऱ्या स्तारावर कार्य करणारी किंवा ग्रामपातळीवर कार्य करणारी संस्था असून महाराष्ट्राच्या पंचायत राज्यव्यवस्थेत ग्रांमपंचायतीचे स्थान फार महत्वाचे आहे कारण ग्रामीण जनतेच्या प्रत्यक्ष संपर्कात अतिशय जवळ असणारी स्थानिक स्वराज्य संस्था असून यीला पंचायत राज्याची पायाभूत संस्था समजल्या जाते. राज्यघटनेच्या चाळीसाव्या कलमा अंतर्गत, ग्रामपंचायतीची स्थापना करून त्यांना स्वयंशासनाचे घटक म्हणून कार्य करता येण्याजोगे सत्ता आणि अधिकार मिळवून देण्याकरिता राज्याकडून प्रयत्न केले जातील.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ या अधिनियमान्वये महाराष्ट्रात पंचायत राज्यसंस्थाची स्थापना झाली असून पंचायत राज्याच्या त्रिस्तरीय योजनेतील ग्रामपंचायत या अतिशय महत्वाच्या संस्थेची स्थापनाचा उल्लेख यात नव्हता. ब्रिटिश राजवटीत पूर्वीच्या मुंबई प्रांतात किंवा महाराष्ट्रात ग्रामपंचायतीची स्थापना झाली होती. स्वतंत्र्योत्तर काळात मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये ग्रांमपंचायतीना स्पष्ट स्वरूप देवून याच अधिनियमान्वये महाराष्ट्रात ग्रामपंचायतीचा कारभार चालविला जात आहे.

ग्रामपंचायतीची रचना:

१९५८ च्या ५ व्या कलमा नुसार, प्रत्येक गावात एक पंचायत असेल म्हणजेच ग्रामपंचायतीची स्थाना करण्या करिता गावाची लोकसंख्या किमान ६०० इतकी असावी किंवा ६०० पेक्षा कमी असल्यास दोन किंवा तीन खेडया मिळून एक गट ग्रामपंचायत ची स्थाना करता येईल. ग्रांमपंचायतीचा कार्यकाल पाच वर्षाचा असून विशिष्ट परिस्थितीत ग्रांमपंचायतीचा निर्धारीत कार्यकाल पूर्ण होण्या अगोदर विसर्जन करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. प्रभागाची निर्मीती, सभासदांची (पंचांची) निवड, आरक्षण किंवा राखीव जागा यात अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग व महिला इत्यांदीची निर्मीती चा उल्लेख यात आहे. तसेच सरपंच व उपसरपंच यांची निवड, सरपंचपदाचे आरक्षण, अविश्वासाचा ठराव, सरपंचाचे अधिकार व कार्यक्षेत्र इत्यांदी या अधिनियमान्वये स्पष्ट केले आहे.

ग्रामसभा:

ग्रामपातळीवर कार्य करणारी ग्रामसभा यालाच प्रत्यक्ष लोकशाहीचा आविष्कार म्हणतात तसेच ग्रामसभेत गावातील सर्व नागरिक आपले विचार मोकळेपणाने व्यक्त करू शकतात आणि आपल्या प्रतिनिधींवर ग्रामस्तरावर नियंत्रण ठेवू शकतात. गावातील सर्व प्रौढ नागरिकांची सभा म्हणजे ग्रामसभा होय. मुंबई ग्रामपचायत अधिनियम १९५८ च्या कलम १८६(१) अनुसार ग्रामसभेची तरतूद केली असून ग्रामसभेला एक वैधानिक संस्था अशी मान्यता मिळाली आहे. इ. स. १९९३ च्या ७३ व्या घटनादुरूस्ती अन्वये राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आलेल्या भागातील कलम २४३ (अ) मध्येही ग्रामसभेचा उल्लेख आहे. या अंतर्गत ग्रामसभेच्या बैठका व कामकाज, ग्रामपंचायतीचा प्रशासकीय प्रमुख, ग्रामपंचायत सचिवाची कार्य व स्थान, ग्रामपंचायतीचे अधिकार व कार्य, ग्रामसूचीतील महत्वाचे विषय (कृर्षी, पशुसंवर्धन, समाजकल्याण, शिक्षण, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, इमारती व दळणवळण, ग्रामोद्योग व कुटीरोद्योग, सहकार, स्वसंरक्षण व ग्रामसंरक्षण व इतर कार्य इत्यांदीची सविस्तर तरतूद या कलमे अंतर्गत केली आहे.

पंचायत राज्यपध्दृतीच्या मूल्यमापन समित्या:

महाराष्ट्रात १९६२ पासून पंचायत राज्यव्यवस्था सुरू असून पंचायत राज्य संस्थेच्या कारभारात सुधारणा तसेच वाटचालीचे मूल्यमापन, त्यातील उणिवा दुर करण्या करिता राज्य व केंद्र सरकारने महत्वपूर्ण समित्यांची निर्मीती केली आहे.

१) ल. ना. बोंगिरवार यांच्या अध्यक्षतेखालील समिती (२ एप्रिल १९७०) पंचायत राज्यसंस्थांच्या कामगिरीविषयी.

२) ग्रामविकास मंत्री बाबुराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली (१९८०)— एक उपसमिती.

३) प्राचार्य पी.बी. पाटील यांच्या अध्यक्षेतीखाली (१८ जून १९८४) पंचायत राज्य मूल्यमापन समिती.

४) व्ही. आर. राव यांच्या अध्यक्षतेखाली समिती (१९६०)

५) पंचायती व सहकार यांच्या अभ्यासासाठी एस.डी. मिश्रा समिती (१९६१)

६) व्ही. ईश्वरन यांच्या अध्यक्षतेखालील पंचायत राज्य प्रशासना संबंधीचा अभ्यास गट (१९६१)

७) आर. आर. दिवाकर यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत राज्य चळवळीतील ग्रामसभेच्या स्थाना संबंधीचा अभ्यास गट. (१९६३)

८) के. संस्थानम यांच्या अध्यक्षतेखालील पंचायत राज्य वित्त व्यवस्थे संबंधीचा अभ्यास गट (१९६३)

९) जी. रामचंद्रन यांच्या अध्यक्षतेखालील पंचायत राज्य प्रशिक्षण केंद्रासंबंधीची मूल्यमापन समिती (१९६६)

१०) दया चौबे यांच्या अध्यक्षतेखालील समाज विकास व पंचायत राज्य विषयक समिती (१९७२)

११)अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत राज्य व्यवस्थेचे मुल्यामापन समिती (१९७७)

१२) जी.व्ही.के. राव यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासाठी प्रशासकीय व्यवस्थे संबंधीची समिती (१९८५)

१३) एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही आणि विकास यांकरिता पंचायत राज्यसंस्थांच्या मजबुती साठीची समिती (१९८६)

निष्कर्ष:

ग्रामपंचायत ग्रामपातळीवर कार्य करणारी स्थानिक स्वराज्य संस्था असून पंचायत राज्याची पायाभूत संस्था आहे. स्थानिक नागरिकांचे या समस्याचे निराकरण करण्याचे काम ग्रामपंचायतच्या माध्यमातून स्थानीक सदस्य, निवडणूकी द्वारे निवडून आलेले पंच यांनी या संस्थेच्या नियमांच्या अधीन राहून अडचनी दुर करण्याचे काम करत असतात. पंचायत राज्य संस्थांच्या कारभारात सुधारणा करण्या करिता, किंवा असलेल्या उणिवा दुर करण्या करिता राज्य व केंद्र सरकारनी पंचायत राज्याव्यवस्थेचे मूल्यमापन करण्या करिता विविध समित्यांची निर्मीती केली गेली आहे.

संदर्भ:

1. Kumar, Pradeep. (2009). Panchayati Raj Institution in India. New Delhi: Omega Publications.
2. नरूला, बी. सी. (२००९). पंचायती राजव्यवस्था. नई दिल्ली: अर्जुन पब्लिशिंग हाउस
3. पाटील, व्ही.बी. (२००९). भारतीय प्रशासन. पुणे : के'सागर पब्लिकेशन्स
4. यादव, धमेंन्द्र सिंह. (२००६). पंचायती राज एवं ग्रामीण विकास. मुंबई : रावत पब्लिकेशन्स
5. वीर, गौतम. (२००९). पंचायती राज व्यवस्था. नई दिल्ली: ओमेगा पब्लिकेशन्स.